
# राज्यात शुक्रवारी १२१ कोरोना रुग्णांची नोंद तर शून्य मृत्यूची नोंद

**मुंबई, दि. २२ ( प्रतिनिधी )** : राज्यातील कोरोनाच्या रुग्णसंख्येत चढ उतार होताना दिसत आहे. शुक्रवारी राज्यात १२१ रुग्णांचे निदान झाले आहे. राज्यातील ॲक्टिव्ह रुग्णसंख्या देखील एक हजारांखाली आली आहे. राज्यात सध्या ८१७ ॲक्टिव्ह रुग्ण आहे. तसेच गेल्या चोवीस तासात शून्य कोरोना रुग्णांचा मृत्यू झाला आहे. राज्यात गेल्या २४ तासात ६६ रुग्ण कोरोनामुक्त होऊन घरी परतले आहेत.

**राज्यात आज शून्य कोरोना रुग्णांचा मृत्यू**

राज्यात आज शून्य कोरोना रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. राज्याचा मृत्यूदर १.८७ टक्के झाला आहे. राज्यात आतापर्यंत ७७,२७, ८५५ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. त्यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९८.११ टक्के झाले आहे. राज्यात आजपर्यंत ७, ९९, ९२,



६५९ प्रयोगशाळा तपासण्या करण्यात आल्या आहे.

**राज्यात सध्या ८१७ ॲक्टिव्ह रुग्ण**

राज्यात सध्या ८१७ ॲक्टिव्ह रुग्ण आहे. यामध्ये राज्यात सर्वाधिक ॲक्टिव्ह रुग्ण मुंबईमध्ये आहेत. मुंबईत ४७४ ॲक्टिव्ह रुग्ण आहे. त्या खालोखाल ॲक्टिव्ह रुग्ण पुण्यात आहे. पुण्यात १८१, ठाण्यात ७१ ॲक्टिव्ह रुग्ण आहे.

देशात कमी झालेली कोरोना रुग्णांची संख्या हळूहळू वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. गेल्या २४ तासात देशात २ हजार ३८० नवीन कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. तर ५६ जणांचा कोरोनामुळे मृत्यू झाल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिली आहे. काल देशात २ हजार ६७ कोरोना रुग्णांची नोंद झाली होती तर ४० रुग्णांचा मृत्यू झाला होती. आज या रुग्णसंख्येत किंचीत वाढ झाली आहे. दरम्यान, देशात आत्तापर्यंत ४ कोटी ३० लाख ४९ हजार ९७४ लोकांना कोरोनाची लागण झाली आहे. तर आत्तापर्यंत कोरोनामुळे ५ लाख २२ हजार ०६२ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिली आहे. तस सध्या देशात सक्रिय रुग्णांची संख्या १३ हजार ४३३ आहे. गेल्या २४ तासांत १,०९३ सक्रिय रुग्णांची नोंद झाली आहे. रुग्णांच्या बरे होण्याचा राष्ट्रीय दर ९८.७६ टक्के आहे.

## शिवसैनिकांकडून भाजपा नेते मोहित कंबोज यांच्या गाडीवर हल्ला

**मुंबई, दि. २२ ( प्रतिनिधी )** : भाजपा नेते मोहित कंबोज यांच्या गाडीवर शिवसैनिकांनी हल्ला केला आहे. मोहित कंबोज हे उत्तर भारतीय भवन येथे एका कार्यक्रमासाठी गेले होते तिथून परतताना हल्ला झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मोहित कंबोज जात असताना कलानगर येथील सिग्नलवर थांबले असता मातोश्री बाहेर असलेल्या शिवसैनिकांनी कंबोज यांची गाडी ओळखून गाडी गाठली आणि शिवीगाळ करत हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या घटनेत कोणालाही कोणत्याही प्रकारची इजा झालेली नाही. शिवसैनिकांनी मोहित कंबोज यांच्या गाडीवर हल्ला करताच पोलिसांनी त्या दिशेने धाव घेत मोठा अनुचित प्रकार होण्यापासून रोखण्यात आलंय. यावेळी जमलेल्या शिवसैनिक कंबोज यांना शिवीगाळ करत असल्याच देखील दिसून येत आहे. जेव्हा भोंग्याचा विषय सुरू झाला तेव्हा कंबोज हे मोफत भोंगे वाटण्यावरून चर्चेत होते. तसेच अनेक वेळा कंबोज यांनी शिवसेनेच्या मोठ्या नेत्यांवर आरोप देखील केले आहेत. खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा हे मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्ष प्रमुख यांचे निवासस्थान मातोश्री बाहेर हनुमान चालीसेचे पठण करणार असल्याने आज दिवसभर शिवसैनिक मोठ्या संख्येने मातोश्री परिसरात उपस्थित होते. दरम्यान मोहित कंबोज हे राणा दांपत्याला मदत करण्याच्या हेतूने इथे आले असावेत असा अंदाज लावला जात आहे.

# भाजप आमदार गणेश नाईकांच्या अडचणीत वाढ; अटकपूर्व जामीन फेटाळला

**ठाणे, दि. २२ ( वार्ताहर )** : भाजप आमदार गणेश नाईक हे एका महिलेसोबत २७ वर्षे लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये होते. या महिलेला धमकावल्याप्रकरणी पोलिसांनी नाईक यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केलंय. कोर्टानं नाईक यांचा अटकपूर्व जामीन फेटाळलाय. त्यामुळं नाईक यांच्यासमोरील अडचणी वाढल्या आहेत. नाईक यांच्याकडून आपल्या जिवाला धोका आहे, असंही या महिलेनं म्हंटलं आहे. दरम्यान, सीबीडी पोलिस ठाण्यात दीपा चौहान या महिलेकडून गणेश नाईक यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय. मागील २७ वर्ष गणेश नाईकांचं महिलेसोबत लिव्ह इन रिलेशनशीप होतं. २७ वर्ष संबंध असल्याचा सदर महिलेनं आरोप केला आहे. इतकंच नाहीतर या रिलेशनशीपमधून या महिलेला एका मुलगा झाला आहे. आता मुलाला गणेश नाईकांनी स्वीकारण्यास नकार दिला. शिवाय, त्या महिलेला जिवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप सदर महिलेनं केला आहे.

दरम्यान, मार्च २०२१ मध्ये आमदार गणेश नाईकांनी मला सीबीडी रेतीबंदर येथील लखानी टॉवर्ससमोरील इमारतीत बोलावून घेतलं. तिथं मी माझ्या मुलाला त्यांचं नाव देण्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी माझ्यासमोर बंदूक ठेवून मला त्रास देऊ नको, असं सांगत तू शांत राहिली नाहीस, तर मी स्वत:लाही संपवेन आणि तुम्हा दोघांनाही संपवेन, अशी धमकी दिल्याचा आरोपही महिलेनं तक्रारीत केलाय, अशी माहिती सीबीडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनिल पाटील यांनी दिली. दरम्यान, भाजप आमदार गणेश नाईक यांनी जामिनासाठी कोर्टात अर्ज केला होता. परंतु, कोर्टानं त्यांचा अटकपूर्व जामीन फेटाळलाय. आता २७ तारखेला नाईक यांच्या अंतरिम जामिनावर सुनावणी होणार आहे.

## पान १ वरून...

### कृत्रिम वीजटंचाईच्या विरोधात भाजपाचे राज्यव्यापी आंदोलन

सरकारच्या बेशिस्तीमुळे वीज मंडळाचा आर्थिक कारभार ढासळला असून त्याला आळा घालण्यासाठी अभ्यास गट नेमण्याची सूचना राज्य वीज नियामक आयोगाने सकारला केली होती. परंतु चार महिले झाले तरी राज्य सरकारने अद्याप अशा अभ्यास गटाची नियुक्तीच केलेली नाही. या माध्यमातून ठाकरे सरकारचा वीज मंडळ मोडीत काढण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न स्पष्ट होत असल्याचे आ. बावनकुळे म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपाचे सरकार सत्तेवर असताना भारनियमनमुक्त महाराष्ट्रावर आघाडी सरकारने पुन्हा वीजटंचाई लादली, असल्याची खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली. राज्य सरकारने कोळसा टंचाईचे खापर केंद्र सरकारवर फोडण्याचा प्रयत्न केला. परंतु तो फसला आणि खाजगी क्षेत्राकडून वीज खरेदीच्या दरावर केंद्र सरकारने मर्यादा घातल्याने राज्य सरकारमधील हितसंबंधीयांची कोंडी होण्यास सुरुवात झाली असल्याचे सांगताना दलालांच्या टक्केवारीच्या राजकारणात अडथळे येत असल्याचा गौप्यस्फोट आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. त्यामुळेच कृत्रिम टंचाई निर्माण करून जनतेला वीजसंकटात ढकलले जात असून, सरकारी कार्यालयांची बिले थकविणारे व ग्राहकांची लुबाडणूक करणारे आघाडी सरकार हेच सर्वात मोठे वीजचोर असल्याचे आ. बावनकुळे म्हणाले. राज्य महसूल विभागाने तातडीने थकबाकीची रक्कम वीज मंडळास देऊन, वाढीव सुरक्षा अनामत वसूल करण्याचा निर्णय मागे घ्यावा, अन्यथा विजेच्या प्रश्नावर महाराष्ट्रात मंत्र्यांना जागोजागी जाब विचारला जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

### भारतात आल्यावर 'बच्चन' झाल्यासारखा फिल येतोय

कमी करण्यासाठी यूके भारतावर लक्ष केंद्रित करून एक सामान्य निर्यात परवाना तयार करत आहे. तर, दुसरीकडे इंडो-पॅसिफिकमध्ये नवीन लढाऊ जेट तंत्रज्ञान, हेलिकॉप्टर आणि पाण्याखालील युद्धक्षेत्रात सहकार्यासह सुरक्षेला प्रोत्साहन देण्यासाठी ब्रिटन भारतासोबत सहयोग करेल असे ब्रिटीश उच्चायुक्तालयाच्या एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. प्रसारमाध्यमांना संबोधित करताना मोदी म्हणाले की, भारत स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षी आझादी का अमृत महोत्सव साजरा करत असताना, ब्रिटिश पंतप्रधानांची भारत भेट ऐतिहासिक असल्याचे म्हटले आहे. बैठकीदरम्यान, दोन्ही नेत्यांमध्ये मुक्त व्यापार करार, ग्लासगो क्लाइमेट कमिटमेंट आणि 'मुक्त आणि खुले' हिंद-प्रशांत महासागर आदी विषयांवर सखोल चर्चा केल्याचे सांगितले जात आहे.

### राणा दाम्पत्याला रोखण्यासाठी शिवसैनिकांची धावाधाव!

तरी त्यांना मातोश्रीपर्यंत पोहोचणे शक्य होणार नाही, हा शिवसैनिकांचा प्रयत्न असेल. राणा दाम्पत्याने शिवसेनेला डिवचू नये अन्यथा त्यांना जशास तसे उत्तर देऊ अशी संतप्त प्रतिक्रिया शिवसैनिकांनी दिली. मात्र आपण गनिमी काव्याने मातोश्रीवर येणारच, असे रवी राणा यांनी म्हटले आहे. या सगळयामुळे मुंबईतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

**मातोश्रीबाहेर गर्दी पाहून मुख्यमंत्र्यांनी मानले सर्वांचे आभार; सकाळी ८ वाजता येण्याचे केले आवाहन**

राणा दांपत्याने ठाकरे कुटुंबीयांचे निवासस्थान असलेल्या मातोश्रीबाहेर येऊन हनुमान चालिसा पठण करण्याचा इशारा दिल्यापासून शिवसैनिक आक्रमक झाले आहेत. राणा दांपत्याला धडा शिकवण्याच्या हेतूने मोठ्या प्रमाणात शिवसैनिक मातोश्रीबाहेर जमा झाले होते. या शिवसैनिकांचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आभार मानले. तसेच त्यांनी सर्वांना आज आपआपल्या घरी जा, असे म्हणत पदाधिकाऱ्यांना उद्या सकाळी ८ वाजता येण्यासाठी आवाहन केले. दरम्यान शिवसैनिक आज रात्री मातोश्रीबाहेर जागता पहारा देणार असल्याचे महापौर किशोरी पेडणेकर यांनी सांगितले.

### मातोश्रीवर आज ९ वाजता हनुमान चालीसाचे पठण करणारच

त्यामुळे माझ्यावर भाजप पुरस्कृत असल्याची टीका होत आहे. परंतू, या टीकेला काहीच अर्थ नाही. वास्तविक भाजप होती म्हणून शिवसेना सत्तेत आली, असा टोलाही रवी राणांनी शिवसेनेला लगावला आहे. हनुमान चालीसा न वाचल्यामुळे ठाकरे सरकारची, अशी परिस्थिती झाली आहे. शिवसैनिकांना रस्त्यावर उतरावे लागत आहे. जर, हनुमान जयंतीच्या दिवशी त्यांनी हनुमान चालीसा वाचली असती, तर त्या ठिकाणी खऱ्या अर्थाने हिंदूंचा अपमान झाला नसता. त्यांना पूर्णपणे बाळासाहेबांच्या विचारांचा विसर पडलेला आहे. महाविकास आघाडीचे संस्कार घेऊन ते खऱ्या अर्थाने या ठिकाणी काम करू शकत नाही. शेतकऱ्यांची परिस्थिती खराब आहे, बेरोजगारी वाढली आहे, औद्योगिक विकास पूर्णपणे थांबलेला आहे. त्यामुळे त्यांच्या वेदना संपवण्यासाठी त्यांना हनुमान चालीसा पठण करणे गरजेचे असल्याचेही रवी राणांनी म्हटले आहे.

### ओबीसी आरक्षणाविषयी पुढील सुनावणी २५ एप्रिलला

ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने शास्त्रीय इम्पिरिकल डाटा सादर करण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले होते. राज्य सरकारने मागासवर्गीय आयोगाला सादर केलेल्या अहवालात अनेक चुका आहेत. तो शास्त्रीय आधारावर नसल्याचे मत नोंदवून नव्याने अहवाल सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने यापूर्वी दिले होते. ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात राज्य सरकार आता नव्याने प्रतिज्ञापत्र दाखल करणार आहे. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडे वेळ मागून घेतली आहे.

## परशुराम घाटातील मेगाब्लॉक २५ एप्रिल ते २५ मेपर्यंत



**रत्नागिरी, दि. २२ ( वार्ताहर )** : मुंबई-गोवा महामार्गावरील चिपळूण तालुक्यातील परशुराम घाट रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी येत्या २५ एप्रिल ते २५ मे या कालावधीत सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत पूर्णपणे बंद राहणार आहे. नागरिकांची सुरक्षा लक्षात घेऊन घातलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या कार्यवाहीनंतर परशुराम घाट रुंदीकरणाचे काम २५ एप्रिलपासून २५ मेपर्यंत घाटात सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत बंद ठेवण्याचा निर्णय आज घेण्यात आला.

मात्र नेमक्या कोणत्या वेळात वाहतूक बंद ठेवायची याचा निर्णय आगामी २ दिवसांत घेतला जाणार आहे. घाटातील रुंदीकरणाच्या कामाला गती देऊन पावसाळयापूर्वी रुंदीकरण पूर्ण करणे तसेच आवश्यक तेथे संरक्षण भिंत उभारणे यासाठी ही वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. साधारणपणे एक महिना हे काम चालेल.

काम सुरू करण्यापूर्वी परशुराम घाटासह चिपळूण ते आंबा घाट आणि खेड ते पनवेल या मार्गावर याबाबतचे फलक लावून माहिती द्यावी, अशी सूचना जिल्हाधिकारी डॉ. बी. एन. पाटील यांनी केली.

घाटात काही वळणांवर अपघात होण्याचा धोका आहे, त्या ठिकाणी गतिरोधक आवश्यक आहे. त्याची उभारणी करण्याची सूचनाही त्यांनी केली. आजच्या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी सुशांत खांडेकर, पोलिस अधीक्षक डॉ. मोहितकुमार गर्ग तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पोलिस परिवहन आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.


**PUBLIC NOTICE**

Mr. Shriraj Thatte is a resident of A-502, Galaxy Exotica Co-op Hsg Soc Ltd, Shahaji Raje Marg, Vile Parle East, Mumbai 57. The society has received application to transfer ownership from Late Mr. Rajiv Govind Thatte and Late Mrs. Manasi Rajiv Thatte to Mr. Shriraj Rajiv Thatte. Any person or persons having any claim / demand in respect of the said flat may inform the Society about the same in writing within 14 days from the date hereof. Thereafter no claim or demand shall be entertained.

Place: Mumbai

sd/-
Hon. Secretary
Galaxy Exotica Co-op Hsg Soc Ltd

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, श्री वज्रेश्वरी योगिनी देवीस इनाम असलेली मौजे कणेरी ता.भिवंडी जि.ठाणे येथिल सर्वे नंबर १० सिटि. सर्वे नं. ४४८ क्षेत्र ५२२.५८ चौ.मिटर जमिन तसेच सिटी स.नं. ४४७ क्षेत्र ३०९ चौ.मिटर जमीन आहे त्या स्थितीत २९ वर्षाचे भाडे कराराने वापरासाठी देण्याचे विश्वस्त मंडळाने ठरविले आहे. तरी, इच्छुक व्यक्तिंनी सदर जमिनीचे वार्षीक भाडे व देवस्थानास देण्यात येणारी व्याज रहित अनामत रक्कम या बाबत तपशिलासह माहिती ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत बंद पाकीटात कार्यालईन वेळेत खालील पत्यावर देण्यात यावी. उशिरा आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

चेअरमन,
श्री वज्रेश्वरी योगिनी देवी संस्थान,
मु.पो. वज्रेश्वरी,ता.भिवंडी,जि.ठाणे
पीन कोड ४०१२०४

टिप: १) निविदा सोबत श्री वज्रेश्वरी योगिनी देवी संस्थान या नावाने
११,०००/- रू.चा धनादेश/डिडी जोडणे अनिवार्य,
२) सदर निविदा मंजुरी बाबतचा अंतिम निर्णय विश्वस्त मंडळाचा राहिल

**जाहीर सूचना**

माझे अशील साई कृपा ए सीएचएस लि. यांना **श्री. इमतियाझ अहमद उस्मान रायबक्कर,** मयत सभासद यांचा मुलगा यांच्याकडून फ्लॅट क्र. ४०४ व ४०५ च्या संदर्भातील शेअरचे हस्तांतरण करण्याकरिता सोसायटीस अर्ज स्विकृत झाला आहे. सदर **उस्मान इब्राहिम रायबक्कर व अमिना उस्मान रायबक्कर** हे दोन फ्लॅट्स धारक १. फ्लॅट क्र. ४०४ व ४०५, ४ था मजला, साई कृपा ए, विनायक ठाकूर नगर, गोडदेव नाका, भाईंदर (पूर्व), जिल्हा ठाणे ४०१ १०५ ही मालमत्ता मे. गणेश कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याकडून विक्रीचे करार दि. १०.०६.१९८२ अनुसार सोसायटीच्या अहवाल अनुसार संयुक्त खरेदीदार आहेत व सोसायटीने विभिन्न क्र. १५१ ते १५५ धारक शेअर प्रमाणपत्र क्र. ३१ जारी केले होते ते करार **श्री. इमतियाझ अहमद उस्मान रायबक्कर** यांच्याद्वारे दि. २७.०१.२०२२ पासून गहाळ झाले आहेत व हरवले आहेत, जे कोणी अन्य कायदेशीर वारस आहेत त्यांनी **उस्मान इब्राहिम रायबक्कर** यांच्या दि. ११.०५.१९८९ रोजी मृत्युनंतर व **अमिना उस्मान रायबक्कर** यांच्या दि. ०७.०२.१९९५ रोजी मृत्युनंतर त्यांचे पालक म्हणून वरील मालमत्तेमधील हक्क रिलीज्ड केले आहेत व ड्युप्लिकेट शेअर प्रमाणपत्र जारी करण्याकरिता अर्ज केला आहे, त्यामुळे आम्ही सोसायटीच्या वतीने याद्वारे दावे/ आक्षेप तसेच कोणतेही अन्य कायदेशीर वारस वा तिसरे पक्ष दावे सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसांच्या आत मागवीत आहे जर कोणाही व्यक्तीस कोणतेही दावे/ आक्षेप असल्यास त्यांनी वकील **पी. एस. शामदासनी** ॲन्ड असोसिएट्स यांना पत्ता, १५४/२, ओसवाल ओरनेट सीएचएस, जेसल पार्क, भाईंदर (पू), जिल्हा ठाणे येथे संपर्क साधावा व/वा माझे अशील यांना त्यांचे दावे, मागण्या काही असल्यास त्या संबंधात सदर दस्तावेज पुरावे यांची प्रतसह सादर करावे. जर सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेच्या १५ दिवसांच्या आत कोणतेही दावे प्राप्त न झाल्यास वरील सदर फ्लॅट्सचे हक्क स्पष्ट व बाजारभाव व सर्व अडथळ्यांपासून मुक्त असलेले गृहित धरले जाईल व सर्व अडथळ्यांपासून मुक्त असलेले सर्व हक्क जारी करण्यात येतील त्यामुळे सोसायटीचे वरील मयत सभासद यांचे अन्य कायदेशीर वारस, दावेदार नसून ड्युप्लिकेट शेअर प्रमाणपत्र जारी करण्यात येईल व **श्री. इमतियाझ अहमद उस्मान रायबक्कर** यांच्या नावे हस्तांतरित करण्यात येतील. कोणतेही दावे त्यानंतर सोसायटीद्वारे विचारात घेतले जाणार नाहीत.

पी. एस. शामदासनी ॲन्ड असोसिएट्स करिता
सही/-
पुष्पा शामदासनी
दि. २३.०४.२०२२ (वकील उच्च न्यायालय)

**PUBLIC NOTICE**

KNOW ALL MEN BY THESE PRESENTS that **Late Batuklal Oghadbhai Shah** and **Late Hasmukh Batuklal Shobhani** was lawful co-owners of Flat No. B/6, 1st Floor, Jeevan Sudha CHS. Ltd., C.D. Barfiwala Marg, Andheri (West), Mumbai - 400058 and holding Share Certificate No. 274-277, distinctive No. 1171-1180 and 1181-1190and1191-1200 and 141-145. That said **Late Batuklal Oghadbhai Shah** died on 02.12.2003 at Mumbai, and his wife Prabhaben Batuklal Shah died on 12.03.2010. behind him, Three sons **Mr. Kirit B. Shah & Mr. Hasmukh B. Shobhani, Pradeep Batuklal Shobhani and two daughters Mrs. Sonal Girish Gandhi (Nee Name Purnima B. Shobhani) & Mrs. Shobhna Kishor Shah (Nee Name Shobhna B. Shah), and Pradeep Batuklal Shobhani** died on 11.03.2007. and his wife **Mrs. Harshada Pradip Shobhani (widow of Late Pradip Batuklal Shobhani)** as his only legal heirs. That **Late Hasmukh Batuklal Shobhani** also died on 23.06.2011, and his wife **ILa Hasmukh Shobhani** also died on 06.10.2009.leaving behind him, his daughter **Ms. Riddhi H. Shobhani** as his only legal heirs to acquire, inherit the said flat as owners thereof. That said **Mr. Kirit B. Shah, Mrs. Sonal Girish Gandhi (Nee Name Purnima B. Shobhani), Mrs. Shobhna Kishor Shah (Nee Name Shobhna B. Shah), and Smt. Harshada Pradip Shobhani (widow of Late Pradip Batuklal Shobhani)** have released their respective share to and in favour of **Ms. Riddhi H. Shobhani** by executing Release Deed dated 21.08.2018 duly registered vide document No. BDR-4/8482/2018 dated 21.08.2018 and as per nomination, said **Ms. Riddhi H. Shobhani** acquired 50% share of her deceased father in said flat premises and at present said **Ms. Riddhi H. Shobhani** is sole owner of the said flat.

Any person / party / legal heirs / representative having any adverse claim or interest over the said Flat or part thereof is asked to put the same in writing to me / my client within 15 days from the date of publication hereof otherwise no claim shall be entertained.

RATNAKAR T. MISHRA
Date: 23/04/2022 (Advocate High Court)
Office: ACBA, 3rd Floor, M.M. Court Andheri, Andheri (E), Mumbai - 69

**जाहिर नोटीस**

मुंबई मंडळाने दि.०२/१२/२०१६ रोजी रंगशारदा सभागृह, वांद्रे (प ), मुंबई -५० येथे एकूण ०३ गिरण्यांची संगणकीय सोडत काढली असता मयत सुनिता पोपट देवळेकर यांना अर्ज क्रमांक ४४५८३४, गिरणी संकेत क्र.२६ -WESTERN INDIA MILL प्राधान्य क्र.४८ ,सदनिका क्र-१,७०६,७०७ साठी सोडतीमध्ये यशस्वी घोषित करण्यात आला आहे. मयत सुनिता पोपट देवळेकर यांचे २९/१०/२००६ रोजी निधन झाले असून त्यांना खालील प्रमाणे वारसदार आहेत.

१. श्री. प्रविण पोपट देवळेकर (मुलगा)
२. सौ. श्वेता संजय साळगांवकर (मुलगी)
३. सौ. संगिता तानाजी पाटील (मुलगी)

मयत सुनिता पोपट देवळेकर यांची सौ. श्वेता संजय साळगांवकर यांनी सदर गिरणी कामगार सदनिके संदर्भात वारस दाखला देण्याबाबत ओल्ड कस्टम कलेक्टर कार्यालयात अर्ज केलेला आहे तरी याबद्दल कोणताही आक्षेप (हरकत) असल्यास त्यांनी खालील पत्यावर ०७ दिवसाच्या आत संपर्क साधावा.

पत्ता:- २९७, जिजामाता नगर, जी. डी. आंबेकर मार्ग, कोळीवाडा विभाग, काळाचौकी, मुंबई-४०००३७

**PUBLIC NOTICE**

My client **Mr. Nazim Abdul Qadir Sayyed**, R/at: New Gauripada, Bhiwandi-421302, do hereby state that he has lost his original **SALE DEED** Of Land situated at Chavindra, Taluka Bhiwandi, Dist. Thane, executed on dt: **09/03/2009**, executed at Sr. **NO. 1425/2009**, before Sub-registrar of Assurances, Bhiwandi-I, has been lost by him since dt:10/01/2022, and FIR has been lodge for the same on dt: 21/04/2022 at :Bhoiwada Police Station having Registration No. 0140/2022, Bhiwandi, Hence this notice is issued, if any one find it return to at above given address.

Shakir Husain
Advocate High Court
Office: 288, Sufi Manzil,
Ahemdabad Road, Nadi Naka,
Bhiwandi, Dist. Thane.
Mobile No. 9320507645

**जाहीर सूचना**

सूचना याद्वारे माझे अशील श्री. रामजी मोरारजी भानुशाली यांच्या वतीने देण्यात येते की, ते राहणार पत्ता ए/५०५, प्रणय किरण बिल्डींग, कामा लेन, हंसोटी लेन, बरोत वाडी, घाटकोपर (पश्चिम), मुंबई ४०० ०८६ व तसेच त्यांचा अस्थायी पत्ता बी-२९/३०, न्यु शैलजा सोसायटी, आर बी मेहता मार्ग, विक्रांत सर्कलजवळ, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०० ०७७ येथील रहिवासी असून ते त्यांचा मुलगा श्री. महेश रामजी भानुशाली यांच्यापासून त्यांच्या वाईट वागण्यामुळे व वाईट सवयींमुळे वेगळे राहतात व तसेच माझे अशील यांनी त्यांचा मुलगा श्री. महेश रामजी भानुशाली व त्यांची पत्नी श्रीम. हिरल महेश भानुशाली व त्यांची मुले अर्थात कु. शिवानी महेश भानुशाली (मुलगी) व श्री. जीत महेश भानुशाली (मुलगा) यांना माझे अशील यांच्याद्वारे मालकीच्या सर्व जंगम व स्थावर मालमत्तांमधून काढून टाकले आहे व माझे अशील यांच्या संबंधातील कोणत्याही मालमत्तेमध्ये त्यांना कोणतेही दावे वा अधिकारी नाही आहेत व त्यामुळे त्यांच्याद्वारे कोणतीही मालमत्ता मालकीची व ताब्यात नाही आहे व ते कोणतेही कर्ज यांकरिता जबाबदार नाही आहेत, सदर श्री. महेश रामजी भानुशाली व त्यांचे कुटुंब यांनी नंतर कंत्राट केल्यास तसेच कोणतेही अग्रिम रक्कमेवर वैयक्तिकरित्या वा माझे अशील यांच्या मालमत्तेवरील प्रतिभूतींवर काही अग्रिम रक्कम मिळविल्यास त्यांनी ते स्वत:च्या जबाबदारीवर करावे. माझे अशील याद्वारे सदर सूचना सर्व संबंधितांना सूचित करण्याकरिता घोषित करत आहेत.

दि. २३ एप्रिल, २०२२
ठिकाण : मुंबई

श्री. विमलेश सिंह
वकील उच्च न्यायालय,
दुकान क्र. १४, १ ला मजला, स्टार हाईट मॉल (भारत सिनेमा), न्यु मिल रोड, रेल्वे स्टेशनजवळ, कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७०

**Public Notice**

Notice is hereby given that my client **Mrs. Johra Begum Rahat Shaikh,** owner of Flat No. 303, 3rd Floor, Building No. B/13, Sumati Vaishali CHS Ltd, Vaishali Nagar, off. S.V Road, Jogeshwari (West), Mumbai - 400102. The Original First Chain of Agreement dated 22/02/1984 executed between Messrs **Vijay Sthapatya (Pvt.) Ltd.** and **Mr. Kiran Ramjibhai Ghedia**, in respect of said Flat No. B/13- 303. My client had lodged lost report with Oshiwara Police Station, Jogeshwari (w), Mumbai, vide lost report No. 972/2022 dated 16/04/2022. Any person/s having any claim shall file an objection in writing along with documentary evidence at 39-B, Shourie Complex, Near Bombay Bazar, J.P Road, Andheri (w), Mumbai - 400058 within **14 days** from the date of this notice, failing which it shall be assumed that no any perosn/s has any claim whatsoever on the said flat of which please take a note.

Sd/-
Shabana A Khan (Advocate High Court)
Place: Mumbai Date: 23/04/2022

**एस्क्वेअर मनी गॅरन्टीज लिमिटेड**
४एफ२ कोर्ट चेंबर्स, ३५, न्यु मरिन लाईन्स मुंबई, महाराष्ट्र ४०० ०२०
ईमेल आयडी : investoremgl@gmail.com
दूर. क्र. ९१६७३४६८८९
सीआयएन : L51900MH1985PLC036946

**जे कोणी सदर संबंधात आहेत**

सूचना याद्वारे सर्व भागधारक, ग्राहक, बिझीनेस असोसिएट्स, भागधारक व सर्व व्यक्ती संबंधित व जनतेचे सभासद यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय जागा ४एफ२, कोर्ट चेंबर्स, ३५, न्यु मरिन लाईन्स, मुंबई ४०० ०२० येथून युनिट # सीजी९, २४/२६, कामा बिल्डींग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१, भारत येथे शहारातील स्थानिक मर्यादेमध्ये दि. २२ एप्रिल, २०२२ रोजी पासून स्थानांतरित करण्याकरिता ठराव मंजूरी देण्याकरिता आज आयोजित करण्यात आली होती, सदरकरिता कृपया नोंद घ्यावी.

एस्क्वेअर मनी गॅरन्टीज लिमिटेडकरिता व त्यांच्या वतीने
सही/-
किशोर गोपाल पाटील
संचालक
ठिकाण : मुंबई
दि. २२.०४.२०२२
डीआयएन : ०५१२१०१७

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that **Mr. Minesh Lalitkumar Pipalia** has agreed to sell & transfer the Flat premises **Flat No 104, 1st Floor, F Wing, Vikram Apartments Delite Co-operative Housing Society Ltd., Situated Nr. Maneklal Estate, LBS Marg, Ghatkopar West, Mumbai - 400086 bearing CTS No 407 to 419, Village – Ghatkopar, Taluka – Kurla, Dist – Mumbai Suburban** to my clients **Mr. Pravin Patel & Mrs. Vandana Patel.** Further the Original Chain Agreements of above premises has been lost from Mr. Minesh L Pipalia, details of which are as under.

1. Agreement for Sale dated 20.04.1983 between M/s Vikram Developers and Naresh Nagindas Sheth & Pradeep Nagindas Sheth.
2. Agreement for Sale dated 27.04.2006 between Pradeep Nagindas Sheth & Dinesh Ramjibhai Bhanushali & Mrs. Geeta Dinesh Bhanushali.

Any person having any claim or right in respect of the said property by way of inheritance, share , sell, mortgage, lease, lien, gift, possession or encumbrance howsoever or otherwise is hereby to call upon to intimate the undersigned within 7 days from the date of publication of this notice of his such claim of any with all supporting documents failing which the transaction in favor of our client shall be completed without reference to such claim & the claims, if any of such person shall be treated as waived & not binding on our clients.

Sd/-
Pankajkumar Mishra
Date: 23/04/2022 Advocate High Court, Bombay
C-12, Asalfe Niwara CHSL, Asalfa Village, Ghatkopar West, Mumbai - 400084

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that Mrs. Maniben Dhanji Bhanushali & Mr. Dhanji Bhanji Bhanushali were the members of Takshashila C.H.S.Ltd., having address at Nirmal Nagar, Mulund Goregaon Link Road, Mulund West, Mumbai 400 080, and holding Flat No.2204A and 2204B respectively in the building of the society. That Mrs. Maniben Dhanji Bhanushali died intestate on 20.07.2006 and Mr. Dhanji Bhanji Bhanushali died intestate on 27.10.2019 leaving behind them my clients [1] Bharat Dhanji Bhanushali and [2] Jatin Dhanji Bhanushali as the only legal heirs, claimants and representatives to the moveable and immoveable property of the deceased.

That Legal heir Mr. Jatin Dhanji Bhanushali has released his undivided share, right, interest in respect of above mentioned flat premises in favour of my client Mr. Bharat Dhanji Bhanushali under Registered Release Deed and hence my client being the absolute owner of the said flat premises submitting an application to the society for transfer of shares and membership of the deceased members in respect of above mentioned flats in his name.

Notice is hereby given that if any person or persons having any right, title, interest, share in the said flat premises or any person having any claim or objection for transfer of share and membership of the deceased members in the name of my client, shall submit their claim alongwith proof within a period of 14 days from the date of publication of this notice to the undersigned. Any claims received thereafter shall not be considered.

GEETA A. PATIL
Advocate High Court
5, Sai Jyot Bldg, S N Road, Mulund West, Mumbai 80. Mob 9773190121.
Place : Mumbai Dated 22.04.2022

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-Tender Notice**

Following Tender is invited in prescribed Tender forms for following Works/Items from reputed E-registered contractors with MSEDCL for following work.

| Tender Number | Name of Tender | Tender Amount (Lakhs) | Tender Fee | Last submission date |
|---|---|---|---|---|
| EE/VSI/2022-23/T-04. | E-tender for Annual Maintenance of Computers, Printers, Scanners, UPS System, all associated equipment's & Networking located under Vasai Rd (East) & Vasai Rd (West) sub divisions under Vasai Division. | 5.0 | 1000/- +GST@ 18% | 29.04.2022 |

The tender documents are available at our website https://etender.mahadiscom.in/eatApp/ from 22.04.2022. For updates visit to our official website of MSEDCL.

EXECUTIVE ENGINEER VASAI DIVISION

**NOTICE**

**Shri Chandrakant Rajaram Lad** member of Mahapalika Laghuvetan K.S.G.S.M. Ekatmata Nagar, J.B. Nagar, Andheri (East) and holding Flat in Bldg no. 3B/30 of the society, died on 07/02/2018 without making any nomination.

The Society hereby invites claims and objections from heir or other claimants within period of 7 days from the publication of this notice. If no claims/ objections are received within the period prescribed above, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member as per bye laws. A copy of registered bye laws of the society is available for inspection by the claimants/ objectors in the office between 11.30 am to 4.00 pm from date of publication of this notice.

Secretary
Mahapalika L.K.S.G.S.M. Andheri

CSB Bank
Formerly The Catholic Syrian Bank Ltd.

सीआयएन क्र. U65191KL1920PLC000175
विरार शाखा : पता - तल मंजिल, दुकान ६ से १०, गोकुळ प्लाझा, मुळजीभाई मेहता इंटरनॅशनल स्कूल के सामने, गोकुळ टाउनशीप, विरार पश्चिम, महाराष्ट्र ४०१ ३०३.
दूर. क्र. ९०७२६०१५७०/९०७२६०१३८८
(पंजीकृत कार्यालय, थ्रिसूर)

**तारण सोन्याच्या दागिण्यांच्या लिलावावर जाहीर सूचना**

विशेषत: कर्जदार व इच्छुक बोलीदार यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, बँकेद्वारे जारी पुन:आमंत्रण/ लिलाव सूचना व प्रदान सूचना पाठवून सुद्धा कर्जदार यांच्याद्वारे बँकेच्या थकबाकींचे प्रदान करण्यास कसूर केल्याने सदर खाते, संबंधित कर्जदार यांच्याद्वारे प्रतिभूती म्हणून बँकेकडे ठेवलेले सोन्याचे दागिणे तारण म्हणून ठेवून त्यांच्याद्वारे कर्ज प्राप्त करण्यात आले होते त्या दागिण्यांची दि. ३० एप्रिल, २०२२ रोजी दु. ३.३० वा. शाखेतील जागेमध्ये प्रत्यक्ष लिलाव मार्फत जशी आहे जेथे आहे व कोणत्याही न तत्त्वावर जाहीर लिलावामध्ये विक्री करण्यात येईल. लिलाव बँकेच्या सूचना फलकामध्ये सदर प्रसिद्धीपासून बँकेच्या निर्णयावर कोणत्याही अन्य दिवशी करण्यात येईल. कर्जदार यांना याद्वारे पुढे सूचित करण्यात येते की, सोन्याचे खाजगी विक्री द्वारे जाहीर लिलाव करण्यात येईल व त्यानंतर उर्वरित थकबाकींची वसुली करण्यात येईल व कायदेशीर कारवाई बँकेच्या उर्वरित रक्कमेच्या वसुलीकरिता कर्जदार यांच्या संबंधात सूचित करण्यात येईल.

| अनु. क्र. | देणगी शाखा | नाव | क्लाएन्ट आयडी | खाते संख्या | दि. ३१ मार्च, २०२२ अनुसार एकूण थकबाकी | निव्वळ वजन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विरार | पारस एच | ३९९४९६४ | २ | १६२४३२ | ६०.८ |
| २ | विरार | भावना जाट | ३७६५७६५ | २ | १७९६०६ | ५३.५ |
| ३ | विरार | सुरज पाटवा | ७३१७६२४ | २ | ८०६५६६ | २०९.६ |

लिलावामध्ये भाग घेण्याकरिता व कर्जदारांच्या खात्याचा तपशील जाणून घेण्याकरिता इच्छुक बोलीदारांनी संबंधित शाखांना संपर्क साधावा.

ठिकाण : विरार
दि. २२.०४.२०२२

प्राधिकृत अधिकारी
सीएसबी बँक